# घटक 2 : सजीवांची उत्क्रांती

**उत्क्रांती - सतत आणि संथ वेगाने होणारा बदल.**

मानवाच्या उत्क्रांतीचे टप्पे:
मानवाची उत्पत्ती एप नावाच्या मानवसदृश्य वानरा पासून .
त्यापासून उत्क्रांत होत मानवाची प्रजाती सर्वप्रथम आफ्रिका खंडात उदयास आली.
यालाच आपण आदिमानव म्हणतो.

इ.स. 1859 मध्ये चार्ल्स डार्विन या शास्त्रज्ञाने आपल्या द ऑरिजिन ऑफ स्पेसीज या ग्रंथात उत्क्रांतीची संकल्पना मांडली. इ. स. 1871 साली त्याने आपल्या द डिसेंट ऑफ मॅन या ग्रंथात माणसाच्यापाठीच्या कण्याचे शेवटचे हाड हे शेपटीचाच एक भाग आहे हे संगितले.

कुशल मानव( होमो हॅबिलिस ) : हातांचा कुशलतेने वापर करणारा .
अस्तित्वाचा पुरावा : आफ्रिकेतील टांझानिया आणि केनिया शोध : शास्त्रज्ञ लुई लिकी
पाठीच्या कण्याला बाक.

ताठ कण्याचा मानव( होमो इरेक्टस )
कुशल मानवाच्या तुलनेत मेंदू विकसित. समूहाने राहत. अग्नीच्या वापराचे महत्व कळले असावे. पण अग्नि तयार करण्याची कला माहीत नव्हती. हत्यारे पूर्वी पेक्षा प्रमाणबद्ध आफ्रिका, आशिया व युरोप खंडात अस्तित्व

शक्तिमान मानव : ( निअँडरथल मानव)
जर्मनी येथील निअँडरथल येथे अस्तित्व .
धिप्पाड शरीरयष्टी , मेंदू अधिक विकसित , गुहांमध्ये वस्ती , मुख्यत्वे मांसाहारी ,अन्न भाजून खात असे. अग्नि निर्माण करण्याची कला अवगत होती . मृत व्यक्ति सोबत प्राण्यांची शिंगे , हत्यारे पुरत. सुमारे 30 हजार वर्षापूर्वी हा मानव नष्ट झाला.

बुद्धिमान मानव ( होमो सेपियन ) युरोपमध्ये क्रोमॅनोन नावाने ओळख . आफ्रिका, आशिया व युरोप खंडात अस्तित्व ।स्वरयंत्र विकसित , लवचिक जिभ ,विकसित भाषा पद्धती . चित्रे काढत होता , वस्तु बनवत होता .

प्रगत बुद्धीचा मानव. ( होमो सेपियन सेपियन ) मेंदू अधिक विकसित. शेतीचे व पशुपालन तंत्र अवगत. अधिक स्थिर जीवन